# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

## जाहिर नोटीस

मा. महासभा क्र. ०४, ठराव क्र. २९, दि. २५/०३/२०२६ तसेच मा. महासभा क्र. ०३, ठराव क्र. ६९, दि. २०/०५/२०२६ अन्वये इचलकरंजी महानगरपालिकेच्या मालकीची एकूण १७ उद्याने व १३ ऑक्सिजन पार्क यांचे देखभाल, स्वच्छता, सुरक्षा, वृक्षसंवर्धन व व्यवस्थापन कार्य N.G.O./ ट्रस्ट / सामाजिक संस्था यांचेमार्फत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार इच्छुक, पात्र व अनुभवी N.G.O./ ट्रस्ट / सामाजिक संस्था यांचेकडून महानगरपालिकेच्या उद्याने व ऑक्सिजन पार्क यांचे देखभाल, स्वच्छता, सुरक्षा, वृक्षसंवर्धन व व्यवस्थापन कामकाज करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्जासोबत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, आवश्यक कागदपत्रे व इतर आवश्यक माहिती जोडणे बंधनकारक राहील.

संबंधित संस्थांनी महानगरपालिकेने मंजूर केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्ज दि.०९ / ०६/ २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत उद्यान विभाग, इचलकरंजी महानगरपालिका येथे सादर करावेत.

सदर अटी व शर्ती, पात्रता निकष व इतर माहिती कार्यालयीन वेळेत उद्यान विभागात उपलब्ध राहील तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर https://ichalkaranjimnp.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

उशिराने प्राप्त झालेले अथवा अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(नंदू परळकर)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका